वर्ष १६ वे

अंक ३ रा

## सर्व सभासद / हितचिंतकांस आग्रहाचे निमंत्रण
## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम - निमंत्रण पत्रिका

-: कार्यक्रमाचे स्थळ :-

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन,**

मालधक्का चौक, मंगळवार पेठ, पुणे ४११०११.

**रविवार दि. २१.०८.२०१६ रोजी दुपारी ४.३० वा.**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

**Website : http://www.parnermitramandalpune.com/**

यांचे मुखपत्र

# संवाद

**ऑगस्ट-सप्टें.-ऑक्टो.-नोव्हेंबर २०१६**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट).
- तिसऱ्या व चौथ्या मजल्याच्या बांधकामाचा अपेक्षित खर्च रु. **एक कोटी**.
- प्रत्येक मजल्यावर ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या.
- खोलीचा आकार १०' x १४'
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ११००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

- **तळमजला व दोन मजले बांधून पूर्ण झाले असून त्यामध्ये ८० विद्यार्थी राहात आहेत.**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं. १७/४अ, मंगलनगर, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( दिनांक : ६ ऑगस्ट, २०१६ )

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि.२१.०८.२०१६** रोजी **दुपारी ४.३० वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मालधक्का चौक, मंगळवार पेठ, पुणे ११** येथे आयोजित केली असून सदर सभेचे कामकाज खालीलप्रमाणे होईल.

१) दि.१६.०८.२०१५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा लेखी अहवाल वाचून मंजूर करणे.

२) चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून आलेल्या २०१५-२०१६ च्या जमाखर्चा संबंधीचा अहवाल वाचून मंजूर करणे.

३) सन २०१६-२०१७ साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

४) भावी कार्याची दिशा ठरविणे.

५) सन २०१६-२०१७ साठी लेखा तपासणीसाची नेमणूक करणे.

६) घटनेप्रमाणे मंडळाच्या कार्यकारिणीची उपस्थित सभासदांमधून निवड होईल.

७) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय असल्यास त्याचा विचार करणे.

**सूचना :-**

१) माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.

२) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी दुपारी ५.०० वाजता त्याच जागी ती सभा भरविण्यात येईल व वरील कामकाज पार पाडण्यात येईल.

३) वरील सभेत मांडण्यासाठी ठराव पाठवायचे असल्यास ते सूचक व अनूमोदक यांच्या पूर्ण नावासह आणि सह्यासह **दि.१४.०८.२०१६** पर्यंत मिळतील असे पाठवावेत.

**✽ आपले नम्र ✽**

**हौसाराम घोडके** — अध्यक्ष
**इंजि.विजयकुमार दुबे** — अध्यक्ष, बांधकाम समिती
**मधुकर शिरोळे** — उपाध्यक्ष

**सुनील पोटे** — सेक्रेटरी
**प्रा.गोरक्ष जगताप** — सहसेक्रेटरी
**बाजीराव जगदाळे** — कार्यवाहक
**अशोक वाबळे** — सहकार्यवाहक

**सदस्य :- सखाराम गागरे, डॉ.बाळासाहेब बांडे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, काशिनाथ गायकवाड, रामदास शिर्के, मुरलीधर चौधरी, बाळासाहेब येणारे, प्रा.माधव गायके, प्रा.सुनील निंबाळकर.**

## ✽ कार्यक्रमाचे स्थळ ✽

**रविवार दि.२१.०८.२०१६ रोजी दुपारी ४.३० वा.**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मालधक्का चौक,**
**मंगळवार पेठ, पुणे ४११ ०११. संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं. १७/४अ, मंगलनगर, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेचा वार्षिक स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम **रविवार दि.२१ ऑगस्ट २०१६** रोजी **दुपारी ४.०० वाजता** **डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, मालधक्का चौक, मंगळवार पेठ, पुणे ४११०११** येथे खालील सन्माननियांच्या उपस्थितीत आयोजित केलेला आहे.

*** अध्यक्ष ***

**मा. राजेंद्र धोरडे पाटील**

बांधकाम व्यावसायिक

*** प्रमुख पाहुणे ***

**मा. पोपटराव पवार**

कार्याध्यक्ष, आदर्श गाव योजना, महाराष्ट्र राज्य

तरी आपण अगत्य उपस्थित रहावे, ही विनंती.

*** आपले नम्र ***

**हौसाराम घोडके** — अध्यक्ष
**इंजि.विजयकुमार ठुबे** — अध्यक्ष, बांधकाम समिती
**मधुकर शिरोळे** — उपाध्यक्ष

**सुनील पोटे** — सेक्रेटरी
**प्रा.गोरक्ष जगताप** — सहसेक्रेटरी
**बाजीराव जगदाळे** — कार्यवाहक
**अशोक वाबळे** — सहकार्यवाहक

**सदस्य :- सखाराम गागरे, डॉ.बाळासाहेब बांडे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, काशिनाथ गायकवाड, रामदास शिर्के, मुरलीधर चौधरी, बाळासाहेब येणारे, प्रा.माधव गायके, प्रा.सुनील निंबाळकर.**

*** कार्यक्रमाचे स्थळ ***

**रविवार दि.२१.०८.२०१६ रोजी दुपारी ४.०० वा.**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मालधक्का चौक,**
**मंगळवार पेठ, पुणे ४११ ०११. संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

# संपादकीय

प्रिय सभासद,

आपल्या मित्र मंडळाचे आयुष्यमान आता ३७ वर्षांचे होत असून प्रगतीचे मोठे पाऊल मंडळाने पुढे टाकले आहे. आपल्या **विद्यार्थी वसतीगृहाचे ४थ्या मजल्याचे काम प्रगतीपथावर असून ५व्याही मजल्याचे काम लवकरच सुरू करणार आहोत**. आधुनिकतेचे अवलंबन करीत वसतीगृहाचे काम पूर्ण करीत आहोत. त्यामध्ये अॅल्युमिनीयमच्या स्लाईडींग खिडक्या, सोलर वॉटर, आधुनिक पद्धतीचे विद्युतीकरण इ. सुविधा समाविष्ट आहेत. हे सर्व काम पूर्ण करण्यासाठी आपणास १ कोटी रूपयांची गरज असून आजपर्यंत मंडळाकडे रू.५० लक्ष जमा झाले आहेत. निधी गोळा करण्याकरीता आपल्या सक्रीय सहकार्याची व योगदानाची आम्ही अपेक्षा करीत आहोत. आपण प्रगतीपथावरील कामाची पाहणी करावी, अशी आपणा सर्वांना विनंती करतो.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी **दि.२१ ऑगस्ट २०१६ रोजी मंडळाकडून स्नेहमेळावा तसेच विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम** आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व विद्यार्थ्यांना शुभेच्छा द्यावेत त्यासाठी मी मंडळातर्फे आपणास आवाहन करीत आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून **मा.श्री.पोपटराव पवार, प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व कार्याध्यक्ष, आदर्श गाव योजना, महाराष्ट्र राज्य** हे मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. आपण त्याचा लाभ घ्यावा अशी अपेक्षा करतो.

याही वर्षी **यु.पी.एस.सी. परीक्षेमध्ये** आपल्या तालुक्यातील **श्री.दत्तात्रय शिंदे, डॉ.संदिप साठे, श्री.विष्णु औटी** तसेच **आदिती वाळुंज** यांनी नेत्रदिपक यश मिळविले आहे व तालुक्याची यु.पी.एस.सी. परीक्षेमध्ये निवड होण्याची परंपरा मोठ्या प्रमाणात यावर्षीही टिकून ठेवली. या सर्वांचे आपल्या तालुक्यातर्फे व मंडळातर्फे हार्दिक अभिनंदन! श्री.विष्णु औटी यांच्या यशावर अध्यक्ष हौसाराम घोडके यांनी संकलीत केलेला लेख या अंकात प्रसिद्ध करीत आहोत. त्याचे कृपया वाचन करावे.

यावर्षी सरासरीएवढा पाऊस पडत असल्याने तालुक्यामध्ये वातावरण समाधानकारक राहील अशी अपेक्षा करून माझ्या संपादकीयास अर्धविराम देतो!!

**जय जिजाऊ। जय शिवराय।।**

**इंजि.विजयकुमार दुबे**
संपादक

## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | अध्यक्ष | ९४२०६९६७९० |
| इंजि.विजयकुमार दुबे | अध्यक्ष,बां.स. | ९४२२०२६२२५ |
| श्री.मधुकर शिरोळे | उपाध्यक्ष | ९९२२१६६१२५ |
| श्री.सुनील पोटे | सेक्रेटरी | ९२२६९२१०८८ |
| श्री.प्रा.गोरक्ष जगताप | सहसेक्रेटरी | ९८६०९०७६१८ |
| श्री.बाजीराव जगदाळे | कार्यवाहक | ९०११०२१४३० |
| श्री.अशोक वाबळे | सहकार्यवाहक | ९८८१६०८३५७ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | सदस्य | ९८२२०५१५९३ |
| श्री.सखाराम गागरे | सदस्य | ९७३००७५०३३ |
| श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६७७२५८११ |
| श्री.मुरलीधर चौधरी | सदस्य | ९३२५६३५२४१ |
| श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ |
| श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| श्री.बाळासाहेब येणारे | सदस्य | ९९२२९६४८२५ |
| श्री.काशिनाथ गायकवाड | सदस्य | ९४२२०१७९४० |
| प्रा.माधव गायके | सदस्य | ९८२२९९५०९७ |
| प्रा.सुनील निंबाळकर | सदस्य | ९४२२२२२०३० |

## वसतिगृह प्रवेश

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे चे सर्व सोयींनी युक्त असे वसतिगृह मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३ येथे सुरु झाले असून प्रवेशासाठी खालील पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**श्री.संजय जंगम - मो. ९४२३०२२१२३, ७०४०५७००६२**

# विद्यार्थी गौरव - दहावी


कु.अनुष्का नितीन रेपाळे, रा.पुणेवाडी ९५.८%



कु.भाविका राहुल चुत्तर, रा.कान्हुर पठार ९५%


कु.ज्ञानल सुरेश शेळके, रा.नारायण गव्हाण ९५%


अजिंक्य रघुनाथ रांधवन, रा.टा.ढोकेश्वर ९४.६%


कु.पौर्णिमा गोरक्ष जगताप, रा.बाबुर्डी ९४.२%


विजय बळवंत जाधव, रा.ना.गव्हाण ९२.७%


आदित्य श्रीकांत चव्हाण, रा. पुणे ९२.६%


चेतन सुनील वराळ, रा.निघोज ९०.६%


कु.ऋषिका सखाराम खोडदे, रा.किन्ही ९०%


कु.सुप्रिया विलास आंधळे, रा.क.हरेश्वर ८९%


निशांत आनंद जाधव, रा.पाडळी दर्या ८८.६%


प्रथमेश आप्पासाहेब पानमंद,रा.गोरेगाव ८८%


कु.प्रियांका बाळासाहेब शिंदे, रा.बाभुळवाडे ८१%


शुभम विजयकुमार गांधी रा.पळशी ८१%


कु.सानिया सुधीर लोंढे, रा.कान्हुर पठार ७९%


कौस्तुभ शिवाजी राऊत, रा.राऊतवाडी ७७%


तेजस अशोक सुंबरे रा.पिंपळगाव रोठा ७५%

# विद्यार्थी गौरव - बारावी शास्त्र


संकेत संजय नांगरे रा.गोरेगाव - ८९%


कु.मितुल प्रशांत आढाव, रा.सांगवी सुर्या - ८५%


शंतनु दत्तात्रय ठुबे रा.कान्हुर प. - ८२.२%


शुभम रामदास सोबले रा.जामगाव ७२%


आदित्य प्रदीप खराडे, रा.निघोज - ७१%


आदित्य संजय बोरकर, रा.वडझिरे - ७१%


संकेत शामकांत करपे रा.मुंगशी ७०%


शिवम् जगन्नाथ शिंदे, रा.हंगे ६९%


कु.श्रद्धा संजय गहाणडुले रा.रांधे - ६५.३%


कु.श्रुती सुनील शेटे, रा.पारनेर - ६५%


प्रसाद काशिनाथ आंधळे रा.कर्जुले हर्या ६५%


कु.नयन रामचंद्र एरंडे रा.वडझिरे - ६४%


दिग्विजय एकनाथ कळमकर, रा.कळमकरवाडी - ६४%


कु.पुनम पंढरीनाथ दिघे रा.वडझिरे - ६२%


कु.सलोनी सुमंत घोडके रा.पारनेर - ६२%

## १२वी आर्टस्

कु.अश्विनी उत्तम सुंबरे रा.पिंपळगाव रोठा - ७५%



## १२वी कॉमर्स

कु.पुजा राजेंद्र मगर, रा.वाघुंडे - ७५%



## १२वी कॉमर्स

कु.विशाखा गेणू काकडे, रा.गोरेगाव - ६५%



# ग्रामस्थांचा सत्कार

* पारनेर येथील भालेराव कुटुंबीयांनी स्वातंत्र्यपूर्व काळात पारनेरच्या जडणघडणी मध्ये अतिशय चांगले योगदान दिलेले आहे. स्वातंत्र्यसैनिक **कै.सदाशिव भालेराव** हे काही वर्ष पारनेर ग्रामपंचायतीचे स्वातंत्र्यपूर्व काळात सरपंच होते. त्यांचे सुपूत्र कै.नारायण सदाशिव भालेराव हे शिवाजीनगर कोर्टामध्ये प्रतिथयश वकील होते. त्यांच्या सुनबाई **अॅड. सौ. इंदुमती नितीन भालेराव** व चिरंजीव **अॅड. नितीन नारायण भालेराव,** यांनी त्यांचे पिताश्री **कै.अॅड.नारायण सदाशिव भालेराव** (मृत्यू दि.२०.१०.२०१०) व **मातोश्री कै.मालतीबाई नारायण भालेराव** (मृत्यू दि.१८.१२.२०१३) यांचे स्मृतीप्रित्यर्थ मंडळाच्या वसतिगृहाच्या एका खोलीसाठी **रू.१,००,०००/-** देणगी देऊन आपल्या आजोबांचे सामाजिक आणि शैक्षणिक कार्य पुढे चालविले आहे. त्यांची एकूण देणगी **रू.१,१७,०००/- झाली आहे.**


कै.नारायण व कै.मालतीबाई भालेराव


श्री.नितीन व सौ.इंदुमती भालेराव

* उद्योगपती **श्री.भगवान सावळेराम पठारे,** रा.राळेगण सिद्धी हे एम.कॉम. बी.एड्. असुनसुद्धा स्वकर्तृत्व, हरहुन्नरीपणा व प्रामाणिकपणाने काम करून आज मोठे उद्योगपती झालेले आहेत. **मा.पद्मविभूषण अण्णासाहेब हजारे** हे त्यांचे आदर्श. त्यामुळेच आज एवढे मोठे यश मिळवून सुद्धा त्यांच्या अंगी नम्रताच आहे. **''आपण जेव्हा उद्योग व्यवसाय व इतर गोष्टीत यश मिळवितो त्याचा अर्थ समाज आपल्या पाठीशी उभा राहिलेला असतो. समाजाचा पाठींबा नसेल तर फारसे यश मिळवू शकत नाही. समाजाचे हे ऋण समाजासाठी काहीतरी देऊन कमी करता येते.''** अशी त्यांची भावना असून ते अनेक धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक संस्थांना सढळ हाताने मदत करीत आहेत. प्रतिकूल परिस्थितीतून एक **यशस्वी उद्योगपती, आदर्श सामाजिक कार्यकर्ता व समाज प्रबोधनकार** असा पठारे यांचा प्रेरक प्रवास आहे.



* **श्री. रामचंद्र नारायण एरंडे उर्फ रामा एरंडे**, रा. वडझिरे या नावाने प्रसिद्ध असलेले रामा हे एक अजब रसायनच आहे. शिक्षणामुळे यांच्या व्यवसायिक प्रगतीची घोडदौड अजिबात थांबलेली नाही. आज पुण्यामध्ये **रामा एरंडे अँड असोसिएटस्** ही बांधकाम क्षेत्रातील अग्रगण्य अशी कंपनी आहे. एवढे असूनसुद्धा वर्षातील साधारणतः १८० ते २०० दिवस ते समाकार्यासाठी देतात व त्यातील बहुतांशी दिवस पारनेर तालुक्यातच असतात. अफाट जनसंपर्क हे त्यांचे वैशिष्ट्य. अनेक सामाजिक आणि शैक्षणिक संस्थेचे ते आश्रयदाते आहेत.



* ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते **डॉ.सुरेश विठ्ठल लोंढे,** हे गरीबांचे डॉक्टर म्हणून कान्हुर पठार परिसरामध्ये प्रसिद्ध होते. गावातील अनेक सामाजिक, शैक्षणिक कार्यात त्यांचा सहभाग असे. याच सामाजिक बांधिलकीतून कान्हुर पठार **जलशुद्धीकरण प्रकल्पाला** त्यांच्या स्वर्गिय पत्नी **सुरेखा उर्फ माई सुरेश लोंढे** यांच्या स्मृतीप्रित्यर्थ भरीव देणगी दिली. कान्हुरकरांनी सुद्धा सदर प्रकल्पाला **कै.माई जलशुद्धीकरण प्रकल्प** असे नाव देऊन **मा.अण्णासाहेब हजारे** यांच्या अध्यक्षतेखाली त्याचे लोकार्पण केले.



* उद्योगपती **श्री. पोपटराव ज्ञानदेव कुंडलीक,** रा.भाळवणी यांना स्पाईसर इंडिया कं. प्रा. लि. २०१६ च्या सप्लायर मेळाव्यामध्ये सलग दुसऱ्या वर्षी **''बेस्ट मशिनींग सप्लायर अवॉर्ड''** प्रदान करण्यात आले.

* **श्री. दत्तात्रय भाऊसाहेब शिंदे** रा. वडगाव सावताळ हे **युपीएससी** परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची ऑल इंडिया रँक ३७७ आहे.

* **कु.आदिती बाळासाहेब वाळुंज,** रा. काकणेवाडी ही **युपीएससी** परीक्षा उत्तीर्ण झाले.

* **डॉ. संदिप प्रदिप साठे,** रा.हंगे हे एम.बी.बी.एस. असून **यु.पी.एस.सी** परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची ऑल इंडिया रँक ७७५ आहे.



* **श्री. विष्णु हरी औटी,** रा. कुंभारवाडी, हे **सहाय्यक विक्रीकर आयुक्त** म्हणून कार्यरत असून ते **युपीएससी** परीक्षा उत्तीर्ण झाले असून त्यांची सहाय्यक आयकर आयुक्त म्हणून निवड झाली.



# नांदा सौख्य भरे

* कै.बबनराव बाळासाहेब लोंढे सर, रा. कान्हुर पठार यांचे सुपुत्र **चि.सौरभ** व श्री.चंद्रकांत मोहनराव गुलदगड, रा.राहुरी यांची सुकन्या **सौ.पुजा (रूपाली)** यांचा शुभविवाह **दि.२०.१२.२०१५** रोजी संपन्न झाला. लोंढे कुटुंबियांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
* श्री.बबनराव भिवाजी डेरे, रा.पाडळी आळे यांचे सुपुत्र **चि.सुयोग** व शंकरराव गोधू काशीद रा.येडगाव, ता.जुन्नर यांची सुकन्या **सौ.प्रियांका** यांचा शुभविवाह **दि.२१.०३.२०१६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.डेरे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
* श्री.रभाजी भिमाजी मातेरे, रा.बाभुळवाडे यांचे सुपुत्र **चि.विशाल** व श्री.भाऊसाहेब मुरलीधर भांगरे, रा.मनोहरपूर, ता.अकोले, जि.नगर यांची सुकन्या **सौ.स्मिता** यांचा शुभविवाह **दि.२५.०३.२०१६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.मातेरे यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.
* श्री.रामदास राजाराम खामकर, रा.वडुले यांची सुकन्या **सौ. प्रियांका** व श्री. वसंत दादाभाऊ कदम, रा.पिंपरी जलसेन यांचे सुपुत्र **चि.किरण** यांचा शुभविवाह **दि.०२.०४.२०१६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.खामकर यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
* श्री.शिवाजी गवराम पुजारी, रा.पारनेर यांची सुकन्या **सौ. मेघना** व श्री.तुकाराम गणपत कपाळे, रा. भाळवणी यांचे सुपुत्र **चि.संदिप (विजय)** यांचा शुभविवाह **दि.१६.०४.२०१६** रोजी संपन्न झाला.
* श्री.चंद्रकांत शामराव मुळे, रा.किन्ही यांची सुकन्या **सौ.शितल** व श्री.काशिनाथ मुरलीधर चव्हाण, रा. परितेवाडी, ता.म्हाडा, जि.सोलापूर यांचे सुपुत्र **चि.कैवल्य** यांचा शुभविवाह **दि.१७.०४.२०१६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.मुळे यांनी मंडळास **रू.२१००/-** देणगी दिली.
* श्री.आबा पांडुरंग खोडदे, रा.गांजीभोयरे यांची सुकन्या **सौ.सविता** व श्री.गजानन किसन ढोरमले, रा.जातेगाव यांचे सुपुत्र **चि.सागर** यांचा शुभविवाह **दि.१७.०४.२०१६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.खोडदे व श्री.ढोरमले या दोन्ही कुटुंबियांनी मंडळास **प्रत्येकी रू.१०००/-** देणगी दिली.
* श्री.ईश्वरलालजी गिरीधरलालजी शिंगवी, रा.कान्हुर पठार यांचे सुपुत्र **चि.प्रतिक (पंकज)** व श्री.गोकुळदासजी देसर्डा, रा.लासलगाव, ता.निफाड, जि.नाशिक यांची सुकन्या **सौ.निरमा** यांचा शुभविवाह **दि.२३.०४.२०१६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त चि.प्रतिक याचे आजोबा **श्री.गिरीधरलालजी शिंगवी** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
* श्री.गोरक्ष आनंदा गवळी, रा.बाबुर्डी, यांचे सुपुत्र **चि.अविनाश** व श्री.भगवान वामन देसाई, रा.साबलखेड, ता.आष्टी, जि.बीड यांची सुकन्या **सौ.समिक्षा** यांचा शुभविवाह **दि.२९.०४.२०१६** रोजी संपन्न झाला. श्री.गवळी यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.
* श्री.पोपट काशिनाथ आवारी, रा.रांधे यांची सुकन्या **सौ.किरण (सोनाली)** व श्री.ठकाजी बाबुराव नवले, रा.हिवरे कोरडा यांचे सुपुत्र **चि.उमेश** यांचा शुभविवाह **दि.२९.०४.२०१६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त सौ.किरण हिचे चुलते श्री.कैलास काशिनाथ आवारी यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.
* श्री.बाबासाहेब जयवंतराव बांडे, रा.टाकळी ढोकेश्वर यांचे सुपुत्र **चि.क्षितीज** व श्री.शिवाजी गवराम खोडदे, रा.किन्ही यांची सुकन्या **सौ.योगिता** यांचा शुभविवाह **दि. २४.०७.२०१६** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.बांडे यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.

## अभिनंदन !

* पारनेर तालुका मित्र मंडळाचे सचिव **श्री.सुनील कुंडलीक पोटे**, रा.बाभुळवाडे यांची **पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षक पतसंस्थेवर अध्यक्ष** म्हणून बिनविरोध निवड झाली.



* **कु.तेजश्री सुधाकर कावरे** रा.सिद्धेश्वरवाडी ही **बी.ए.** ला योगशास्त्र विषय घेऊन ७९ टक्के गुणांनी उत्तीर्ण झाली. तसेच तिची **कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर** तर्फे आंतरराज्य स्पर्धेमध्ये दि.२१.०६.२०१६ च्या जागतिक योगानिमित्त इंडियन नेव्ही, **कोचीन येथे नेव्हीतील सैनिकांना ट्रेनींग देण्याकरीता भारत सरकारतर्फे** निवड झाली.



* **श्री. सुरेश नागनाथ ठाणगे**, रा.तिखोल हे नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग महाराष्ट्र राज्य या विभागात दुय्यम निबंधक म्हणून कार्यरत होते. त्यांची **सह.दुय्यम निबंधक वर्ग-२** (राजपत्रित अधिकारी) या पदावर पदोन्नती झाली.



* **कु. सुशांत निळकंठ मापारी**, रा. राळेगण सिद्धी हा एम. आय. टी. कोथरूड महाविद्यालयामध्ये बिझनेस मॅनेजमेंटच्या द्वितीय वर्षात शिकत असून त्याची कॉलेजतर्फे **युरोप खंडात अभ्यास दौऱ्यासाठी** निवड झाली.



# सेवानिवृत्ती



* **सौ.संजिवनी ज्ञानदेव एरंडे,** रा.वडझिरे, या पुणे महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालयामधून ३० वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०३.२०१५** रोजी **माध्यमिक शिक्षिका** म्हणून सेवानिवृत्त झाल्या. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **सौ.प्राची प्रमोद काळे,** रा.शहाजापुर या ३५ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०१.२०१६** रोजी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीमधून ह्युमन रिसोअर्सेस विभागातून सेवानिवृत्त झाल्या. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२५००/-** देणगी दिली.



* **श्री.प्रकाश कृष्णराव ठुबे (आय.ए.एस.)** रा. कान्हुर पठार हे ३० वर्षांच्या सेवेनंतर महाराष्ट्र राज्याच्या **'प्रकल्प संचालक, वर्ल्ड बँक प्रोजेक्ट'** म्हणून **दि.३०.०४.२०१६** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी **रू.११०००/-** देणगी दिली.



* **डॉ.दत्तात्रय दौलतराव पठारे,** रा. वाळवणे हे ३५ वर्षांच्या सेवेनंतर शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे येथून **अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक** म्हणून **दि.३१.०५.२०१६** रोजी सेवानिवृत्त झाले.



* **श्री.नामदेव भागूजी ठुबे,** रा. कान्हुर पठार हे ३७ वर्ष ६ महिन्यांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०१६** रोजी इंडियन ओव्हरसिज बँकेतून **विशेष सहाय्यक अधिकारी** म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



* **श्री.संजीव गंगाधर वाबळे,** रा.घाणेगाव हे ३५ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०१६** रोजी पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य या विभागातून **वरिष्ठ सहाय्यक** म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **श्री.सुभाष मळुजी घोरपडे,** रा.चिंचोली हे ३८ वर्षांच्या सेवेनंतर टाटा मोटर्स कंपनीतून **दि.३१.०५.२०१६** रोजी म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **श्रीमती पुष्पलता बबनराव लोंढे,** रा.कान्हुर पठार या ३० वर्षांच्या सेवेनंतर महात्मा गांधी विद्यालय, उरूळी कांचन या संस्थेमधून **दि.३१.०५.२०१६** रोजी म्हणून सेवानिवृत्त झाल्या. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **इंजि.विलास नानाभाऊ ठुबे,** रा.कान्हुर पठार हे ३४ वर्षांच्या सेवेनंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य या विभागातून **शाखा अभियंता** म्हणून **दि. ३१.०५.२०१६** रोजी म्हणून सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



* **श्री.काशिनाथ बाबुराव नवले,** रा.नारायण गव्हाण हे ३८ वर्षाच्या सेवेनंतर अल्फा लावल या आंतरराष्ट्रीय कंपनीतून **दि.३०.०६.२०१६** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



* **सौ.भारती भास्करराव घोडके,** रा.पारनेर या ३५ वर्षांच्या **दि.३१.०७.२०१६** रोजी रयत शिक्षण संस्थेच्या प्रवरानगरच्या महात्मा गांधी विद्यालयातून **सहशिक्षिका** म्हणून सेवानिवृत्त झाल्या. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



* **श्री.गुलाबराव गुणाजी बुचडे,** रा.विरोली हे ३२ वर्षाच्या सेवेनंतर दि महानगर को-ऑपरेटिव्ह बँकेमधून **मॅनेजर** म्हणून **दि.३१.०७.२०१६** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

## आपण असे केले तर



* **स्व.सौ.शारदाबाई मिश्रीलालजी कर्नावट** रा.वासुंदे यांच्या **दि.१८.०७.२०१६** च्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे पती **श्री. मिश्रीलालजी पेमराजजी कर्नावट** व सुकन्या **सौ. सिमा मनोज भंडारी** यांनी प्रत्येकी **रू.१०००/-** देणगी दिली.



* **श्री. महादेव गेणू आंबेडकर** रा. हत्तलखिंडी यांनी त्यांच्या हिरक महोत्सवी वर्षा निमित्त (एकसष्टी निमित्त) **रु.१०००/-** देणगी दिली.

# आपण असे केले तर



❊ **पिताश्री वै. सखाराम मारुतराव जगताप** (मृत्यु दिनांक ०६.०१.२०११) **व मातोश्री वै. विजयाबाई सखाराम जगताप** (मृत्यु दिनांक ०३.१०.२०१२) रा. गोरेगाव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री.संदिप व श्री.सचिन यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❊ प्रा.दिलीप वामन बागूल रा.मांडवे खुर्द यांनी त्यांचे सुपुत्र **चि. विश्वजीत** यांच्या **दि.११.४.२०१६**च्या वाढदिवसानिमित्त यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ पारनेर तालुका मित्र मंडळाचे संस्थापक **अध्यक्ष कै.वामन शंकर भोंग गुरूजी** यांच्या दि.०२.०५.२०१६ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त त्यांच्या सुनबाई श्रीमती मंदाताई विनायक कुलकर्णी यांनी मंडळास **रू.१,०००/-** देणगी दिली.



❊ **स्व. बसंतीबाई बन्सीलालजी गांधी** रा.सुपे यांच्या **दि.११.०५.२०१६** च्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र श्री.अशोकलालजी यांनी मंडळास **रू.५००/-** देणगी दिली.



❊ **कै.गिरीधारीलाल बिरदीचंद कटारिया** रा.तिखोल यांच्या **दि.०८.०८.२०१६** च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.नितीन यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. उत्तमचंद रामचंद कर्नावट** रा. खडकवाडी यांनी त्यांचे सुपुत्र **स्व. मनोज** यांच्या दिनांक **१०.०८.२०१६** च्या स्मृती दिनाप्रित्यर्थ मंडळास **रु.११००/-** देणगी दिली.



❊ श्री.बाळासाहेब हरिभाऊ येणारे, रा. रायतळे यांनी त्यांचे सुपुत्र **चि. स्वराज** याच्या दिनांक **०९.०४.२०१६** च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.राजाराम नाना पागीरे,** रा. पिंपरी पठार यांनी **दि.११.०५.२०१६** रोजीच्या लग्नाच्या वाढदिवसा निमित्त **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. अमृतराव क्षीरसागर,** रा. जामगाव यांनी त्यांचे जेष्ठ बंधू **कै.जयवंतराव बळवंतराव क्षीरसागर** यांचे **दि. ०२.०३.२०१६** च्या स्मृती दिना निमित्त मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली



❊ **श्री.चंद्रकांत पंढरीनाथ विप्रदास,** रा.गांजीभोयरे यांनी त्यांच्या मातोश्री कै.मालतीबाई पंढरीनाथ विप्रदास यांच्या **दि.०४.०६.२०१६** च्या प्रथम स्मृती दिनानिमित्त मंडळास **रू.१२०००/-** देणगी दिली.

❊ **श्री. अशोक अंबादास दहिवळ,** रा.पिंपरी जलसेन यांनी त्यांचा नातू (मुलीचा मुलगा) **चि.रूजल सचिन शेखरे** याच्या **दि.२८.०३.२०१६** च्या तसेच दुसरी नात (मुलीची मुलगी) **कु.सहेर अमर यशवंतराव** हिच्या **दि.१४.०५.२०१६** च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.३०११/-** देणगी दिली.



❊ **श्री.बाबाजी लक्ष्मण कदम,** रा.पिंपरी जलसेन यांनी त्यांचे पिताश्री **श्री.लक्ष्मण गेणूजी कदम** यांच्या **दि.११.०५.२०१६** रोजी सुरू होणाऱ्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

## निधन वार्ता



* **श्रीमती जयश्री जयसिंग देशमुख,** वय ५३, रा.पारनेर यांचे **दि.१२.११.२०१५** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.मुकुल जयसिंग देशमुख** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.⇨



* **श्रीमती सुरजबाई चांदमलजी कटारिया,** वय ७६ वर्षे, रा.पाडळी दर्या यांचे **दि.१४.०१.२०१६** रोजी निधन झाले.



* **रघुनाथ नारायण बापट,** वय ८४ वर्षे, रा.पारनेर यांचे **दि.१५.०३.२०१६** रोजी निधन झाले. ⇨



* **रामदास खंडू खोसे,** वय ५६ वर्षे, रा.पाडळी दर्या यांचे **दि.३१.०३.२०१६** रोजी निधन झाले.



* **ह.भ.प. मारुती बाबाजी नवले,** वय ८४ वर्षे, रा.वेसदरे यांचे **दि.१६.०४.२०१६** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे नातू **श्री.कपील पाराजी मोरे**, रा. वडझिरे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.⇨



* 'आदर्श शिक्षक पुरस्कार' भारत सरकार यांचेतर्फे सन्मानीत झालेले **दत्तात्रय आप्पाजी ठुबे,** वय ७८ वर्षे, रा.कान्हुर पठार यांचे **दि.२१.०६.२०१६** रोजी निधन झाले.

कर्तृत्व पारनेरकरांचे

# जिद्दी आई-वडील, ध्येयवेडा मुलगा - विष्णू!



श्री.हरिभाऊ औटी सौ.रंगुबाई औटी

**पा**रनेरच्या जवळ दशाबाई डोंगराच्या पायथ्याला जेमतेम ५०० वस्तीची **कुंभारवाडी.** अशा गावात अपघातात डोळे गमावलेले **श्री.हरिभाऊ औटी** व त्यांची कमी ऐकू येणारी पत्नी **सौ.रंगुबाई** असे हे **दिव्यांगी जोडपे** असल्यामुळे त्या परिसरातील रिकामटेकड्या लोकांचा टिंगलटवाळीचा विषय होता. परंतु दोघेही नवराबायको दिव्यांगी असले तरी अत्यंत कष्टाळू. त्यांना दोन मुले आणि तीन मुली शिवाय वयस्कर आई. असे हे कुटुंब. हरिभाऊ अंध असल्यामुळे त्यांना काम मिळणे सुद्धा मारामार. तरीसुद्धा पडेल ते काम करून त्यात जे काही मिळेल त्यात भागवीत असत. धान्य विकत घेणे शक्य नसल्यामुळे गावातील पिठाच्या गिरणीमध्ये खाली पडलेले पीठ विकत घेऊन त्याच्याच भाकऱ्या करून खाण्याचा त्यांचा रोजचा परिपाठ. दररोज शाळा सुटल्यावर त्यांचा थोरला मुलगा विष्णु गिरणीवाल्याकडे जाऊन पीठ विकत आणत असे. गिरणी मालक श्री.दशरथ उदावंत यांना त्यांची परिस्थिती माहीत असल्यामुळे ते कमी भावाने पीठ देत असत. विष्णु डोक्यावर पिठाचे गाठोडे घेऊन येताना दिसला की घरात चुल पेटवण्याची तयारी व्हायची. कधी कधी वीज नसल्यामुळे पीठ नसायचे. त्यावेळेस वालाच्या घुगऱ्या शिजवून खायचे. जमेल तेवढ्या भाकरी करून अगोदर मुलांना घालून नंतर आईवडील जेवणार. कमी भाकरी असली तरी म्हणणार 'आमचे पोट भरले' किंवा आई आठवड्यातून ३-३ दिवस उपवास करायची. आज विष्णूला कळते की, घरात पूर्ण अन्न नसल्यामुळे उपवासाच्या नावाच्या उपाशी राहात असे. परंतु हरिभाऊची शिकवण त्यातही दिसून यायची. ते विष्णुला म्हणायचे, **'बघ आपण पडलेले पीठ खाऊन जगतो. त्याची आठवण ठेव. हे दिवस कायम नसतात. आयुष्यात असे काही कर की, जग तुझ्या कर्तृत्वाला सलाम करतील.'** रात्रीच्या चिमणीच्या उजेडात सुद्धा आई-वडील विष्णुला कायम प्रोत्साहन देत असत.

अशा परिस्थितीत विष्णु ७ वी पास झाला. पुढे शिकविण्याची ऐपत नव्हती. पण हरिभाऊंची भविष्याकडे पाहण्याची दृष्टी फार उत्तुंग होती. ५ कि.मी. दूर पुणेवाडीला त्यांनी विष्णुचा हायस्कुल प्रवेश घेतला आणि पहिल्याच दिवशी तेथील मुख्याध्यापकांना विनंती करून सांगितले की, **माझ्या मुलाला मी तुमच्या हवाली करीत आहे. मी याला फक्त शाळेतच पाठवू शकतो. शाळेच्या संपूर्ण व्यवस्थापनाने सुद्धा विष्णुची सर्व शैक्षणिक जबाबदारी घेतली.** शिक्षक त्याला आपल्या डब्यातले खायला देत असत. या विना वेतन काम करणाऱ्या शिक्षकांनी विष्णुला त्यांच्या कुटुंबातला घटक बनविला. **शाळेतील शिक्षक विष्णुसाठी फार मोठे उर्जास्त्रोत बनले.**

शाळेतील मुले सुद्धा विष्णुला कमी ऐकू येत असल्यामुळे



त्याला अभ्यासासाठी मदत करीत असत व अभ्यास मागे राहणार नाही याची काळजी घेत असत. ११वी-१२वी च्या आणि डी.एड्. च्या शिक्षणासाठी याच शिक्षकांनी व विष्णु याचे आतेभाऊ **श्री.प्रकाश देशमुख** यांनी त्याला आर्थिक मदत केली आणि डी.एड्. झाल्यानंतर जामखेड तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक म्हणून नोकरी लागली. त्या दरम्यान विष्णुचे लग्नही झाले. विष्णु आता एक जबाबदार नागरिक झाला.

पण त्याचे ध्येय त्याला शांत बसू देत नसे. सकाळी ८.३० ते सायं. ६ पर्यंत शाळेत काम करूनसुद्धा विष्णुने मुक्त विद्यापीठातून **बी.ए.** केले. त्यानंतर त्याची बदली श्रीगोंदा तालुक्यात झाली. याच काळात **एम.पी.एस.सी. परीक्षा पास होऊन सहाय्यक विक्रीकर आयुक्त** म्हणून नेमणूक झाली.

जिद्दी आईवडीलांचे चिरंजीव श्री.विष्णू एवढ्यातच थांबतील तर काय बिशाद. त्यांना आता यशाचे क्षितीज खुणावू लागले. ते २०१३ पासून **यु.पी.एस.सी.** परीक्षेची तयारी करू लागले. त्यांनी कुठलाही क्लास लावला नाही. परंतु त्यांचे मित्र **श्री.विजय कुलांगे, आय.ए.एस. व श्री. समाधान महाजन, सहाय्यक विक्रीकर आयुक्त** यांनी त्यांना सतत प्रोत्साहन व मार्गदर्शन केले. दोन वेळा त्यांना यु.पी.एस.सी. नापासाचा धक्का बसला. पण **पत्नी सौ.सविता** आणि मुले यांच्या प्रोत्साहनामुळे त्यांना नैराश्य आले नाही व तिसऱ्या वेळेला ते यु.पी.एस.सी. उत्तीर्ण होऊन त्यांची **सहाय्यक आयकर आयुक्त** म्हणून निवड झाली आहे.

वडील हरिभाऊ अंध असल्यामुळे पेपरात येणाऱ्या फोटो व बातमीला पाहू शकत नव्हते. पण लोकांकडून ऐकून त्यांना खुप आनंद होत आहे. त्यांचा भाऊ (विष्णु) हा कलेक्टर झाला हे सांगतांना दृष्टी गमावून बसलेल्या हरिभाऊंना आपल्या डोळ्यातील पाणी रोखता येत नाही. आई जरी हे कौतुक ऐकू शकत नाही तरी ती सुद्धा पेपरातील फोटो पाहून अत्यंत आनंदीत होते.

नेहमी चांगल्या गोष्टीची प्रेरणा देणारे व प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहण्याची अंगभूत आदीम शक्ती असणारे असे हे जगावेगळे आईवडील व भाऊ बहिणी यांच्या संघर्षमय आयुष्याला माझा सलाम. श्री. विष्णुंना आयुष्यातल्या प्रत्येक पायरीवर खुप जणांनी मदत केली. त्यात प्रामुख्याने **विना अनुदान शाळेतील शिक्षक, विद्यार्थी मित्र, नोकरीतील सहकारी यांचे ते कायम कृतज्ञ आहेत असे ते सांगतात.** आजुबाजुला समाजात अनेक बऱ्यावाईट घटना घडतात. परंतु समाजात चांगुलपणा सुद्धा आहे, त्याचा फायदा घेणारी योग्य व्यक्ती असल्यास त्याचे भलेच होते.

**शब्दांकन - हौसाराम घोडके**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## जमा-खर्च पत्रक १.४.२०१५ ते ३१.०३.२०१६ अखेरचे

| जमा | रक्कम रू. | रक्कम रू. | खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | | | | | |
| रोख | २७०१.०० | | लिहीणावळ खर्च | १००००.०० | |
| बँक ऑफ महाराष्ट्र - ५३५१२ | २१२०५५.०० | | ऑडीट फी | १००००.०० | |
| स्टेट बँक - ३००३१८४९७८ | ३४१६९.०० | | बँक चार्जेस | १५७९.१५ | |
| महानगर को-ऑप.बँक | ११३१४१.०० | | | | |
| सुवर्णयुग सह. बँक - १७७० | २६१७८८.०५ | ६२३८५४.०५ | साफसफाई खर्च | ८६३९.०० | |
| | | | शैक्षणिक मदत | ८०००.०० | |
| बचत ठेव व्याज खाते | | ३३९४५.०० | इलेक्ट्रीक देखभाल व दुरूस्ती खर्च | ३८३२.०० | |
| मुदत ठेव व्याज खाते | | ३११०५४.०० | वीजबील खर्च | १६९८४०.०० | |
| ईमारत निधी | | १४७२०७९.०० | किरकोळ खर्च | २१४९.०० | |
| | | | न्युजपेपर आणि मासिके | ४७३.०० | |
| हॉस्टेल फी | | ९७९६६७.०० | ऑफिस खर्च | ७४६५.०० | |
| फॉर्म फी | | ३०९०.०० | पी.सी.एम.सी. टॅक्स | ४९३५५.०० | |
| | | | पोस्टेज | ३९७१.०० | |
| ईनकम टॅक्स रिफंड व्याज | | १५७९.०० | छपाई स्टेशनरी खर्च | ३८५४९.०० | |
| किरकोळ जमा | | ७५०.०० | प्रोफेशनल चार्जेस | ५०००.०० | |
| वसतीगृह दंड | | ५६८९.०० | पगार मॅनेजर | १२३०००.०० | |
| हॉस्टेल वीजबील जमा | | ९५४९.०० | मानधन | ६०००.०० | |
| | | | देखभाल व दुरूस्ती खर्च | २५५४०.०० | |
| | | | स्नेह मेळावा खर्च | ६५८२९.०० | |
| अनामत | | ३५०००.०० | स्विपर पगार | ५००००.०० | |
| | | | प्रवास खर्च | १२८९५.०० | |
| ईनकम टॅक्स रिफंड | | १५०६१.०० | वॉचमन पगार | १३३३४८.०० | |
| पुजाराम घशिग अनामत | | ९०००.०० | पाणी पटटी | ६००.०० | |
| | | | वेब साईट खर्च | ९०००.०० | |
| मुदत ठेव व्याज येणे | | १३८२००.०० | झेरॉक्स व टायपिंग खर्च | ३१९८.०० | ७४८२६२.१५ |
| | | | मुदत ठेव नावे | | ४०८२०३०.०० |
| | | | वसतीगृह अनामत डिपॉझिट | | १६२३००.०० |
| | | | टी.डी.एस. | | ३१०८४.०० |
| | | | मुदत ठेव व्याज येणे | | ३०८०६.०० |
| | | | अनामत | | ३५०००.०० |
| | | | पी.सी.एम.सी.चार्जेस बांधकाम | | १०५३१००.०० |
| वसतीगृह अनामत डिपॉझिट | | १७५१५१.०० | अखेर शिल्लक | | |
| मुदत ठेव जमा | | ३२८१३७२.०० | रोख | ७१.०० | |
| | | | बँक ऑफ महाराष्ट्र - ५३५१२ | २७३३२५.०० | |
| | | | स्टेट बँक - ३००३१८४९७८ | ३९४०२८.०० | |
| | | | महानगर को-ऑप.बँक | ५६७८४.०० | |
| | | | सुवर्णयुग सह. बँक - १७७० | २२८२४९.९० | ९५२४५७.९० |
| एकूण रक्कम | | ७०९५०४०.०५ | एकूण रक्कम | | ७०९५०४०.०५ |

| सुनील पोटे | मधुकर शिरोळे | हौसाराम घोडके | मे.के.बी.साळुंके अँड कं. |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## उत्पन्न खर्च पत्रक १.४.२०१५ ते ३१.३.२०१६ अखेरचे

| खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. | उत्पन्न | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| लिहीणावळ खर्च | 10000.00 | | बचत ठेव व्याज खाते | | 33945.00 |
| ऑडीट फी | 10000.00 | | मुदत ठेव व्याज खाते | | 311054.00 |
| बँक चार्जेस | 1579.15 | | | | |
| साफसफाई खर्च | 8639.00 | | | | |
| शैक्षणिक मदत | 8000.00 | | वसतीगृह फी | | 979667.00 |
| इलेक्ट्रीक देखभाल व दुरूस्ती खर्च | 3832.00 | | फॉर्म फी | | 3090.00 |
| वीजबील खर्च | 169840.00 | | | | |
| किरकोळ खर्च | 2149.00 | | ईनकम टॅक्स रिफंड व्याज | | 1579.00 |
| न्युजपेपर आणि मासिके | 473.00 | | किरकोळ जमा | | 750.00 |
| ऑफिस खर्च | 7465.00 | | वसतीगृह दंड | | 5689.00 |
| पी.सी.एम.सी. टॅक्स | 49355.00 | | वसतीगृह वीजबील जमा | | 9549.00 |
| पोस्टेज | 3971.00 | | | | |
| छपाई स्टेशनरी खर्च | 38549.00 | | | | |
| प्रोफेशनल चार्जेस | 5000.00 | | | | |
| पगार मॅनेजर | 123000.00 | | | | |
| मानधन | 6000.00 | | | | |
| देखभाल व दुरूस्ती खर्च | 25540.00 | | | | |
| स्नेह मेळावा खर्च | 65829.00 | | | | |
| स्विपर पगार | 50000.00 | | | | |
| प्रवास खर्च | 12895.00 | | | | |
| वॉचमन पगार | 133348.00 | | | | |
| पाणी पटटी | 600.00 | | | | |
| वेब साईट खर्च | 9000.00 | | | | |
| झेरॉक्स व टायपिंग खर्च | 3198.00 | 748262.15 | | | |
| घसारा | | 63348.71 | | | |
| नफा ताळेबंदास वर्ग | | 533712.14 | | | |
| एकूण रक्कम | | 1345323.00 | एकूण रक्कम | | 1345323.00 |

**सुनील पोटे** सेक्रेटरी | **मधुकर शिरोळे** उपाध्यक्ष | **हौसाराम घोडके** अध्यक्ष | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** लेखा परीक्षक

***मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी मदत,***
***म्हणजेच आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी मदत !***
***मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा,***
***आपल्या नातेवाईक, मित्रमंडळींना मदत करायला सांगा !***

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## ताळेबंद पत्रक ३१.०३.२०१६अखेरचे

| जिंदगी व देणी | रक्कम रु. | रक्कम रु. | स्थावर मालमत्ता व येणी | रक्कम रु. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| ट्रस्ट निधी | | | स्थिर मालमत्ता | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | 73294.00 | जमीन खरेदी | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | 845311.00 |
| इतर निधी | | | इमारत बांधकाम | | |
| इमारत निधी | | 14459550.03 | मागील ताळेबंदाप्रमाणे | | 6303505.00 |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | 12987471.03 | | टी.डी.आर. | | |
| अधिक जमा - चालू वर्षी | 1472079.00 | | मागील ताळेबंदाप्रमाणे | 2113105.00 | |
| | | | पी.सी.एम.सी.चार्जेस बांधकाम | 1053100.00 | 3166205.00 |
| | | | बोअरवेल - मागील ताळेबंदाप्रमाणे | | 10050.00 |
| शैक्षणिक फंड | | | मोटरपंप - मागील ताळेबंदाप्रमाणे | 19573.00 | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | 96725.00 | वजा घसारा - 10% | 1957.00 | 17616.00 |
| अंत्यविधी निधी | | | फर्निचर व फिक्स्चर | | 545687.00 |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | 130122.00 | मागील ताळेबंदाप्रमाणे | 606318.71 | |
| | | | वजा घसारा - 10% | 60631.71 | |
| वसतीगृह अनामत (डिपॉझिट) | | 124756.00 | | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | 111905.00 | | वॉटर प्युरिफायर खरेदी | 7596.00 | |
| अधिक जमा - चालू वर्षी | 175151.00 | | वजा घसारा - 10% | 760.00 | |
| | 287056.00 | | | | 6836.00 |
| वजा - चालू वर्षी | 162300.00 | | वृक्ष संवर्धन ठेव | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | 9000.00 |
| उत्पन्न खर्च खाते | | | एम.एस.ई.बी. डिपॉझिट | | 10000.00 |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | 636635.73 | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | |
| - चालू वर्षी | 533712.14 | 1170347.87 | | | |
| | | | मुदत ठेव | | 4082030.00 |
| | | | अनामत | | |
| | | | आनंदा शिंदे | | 14500.00 |
| | | | मुदत ठेव व्याज येणे | | 30806.00 |
| | | | टि.डि.एस. 2014 15 | 29707.00 | |
| | | | टि.डि.एस. 2015 6 | 31084.00 | 60791.00 |
| | | | रोख व बँक शिल्लक | | |
| | | | रोख | | 71.00 |
| | | | बँक ऑफ महाराष्ट्र - 53512 | 273325.00 | |
| | | | स्टेट बँक - 3003184978 | 394028.00 | |
| | | | महानगर को-ऑप.बँक | 56784.00 | |
| | | | सुवर्णयुग सह. बँक - 1770 | 228249.90 | 952386.90 |
| एकूण रुपये | | 16054794.90 | एकूण रुपये | | 16054794.90 |

| सुनील पोटे | मधुकर शिरोळे | हौसाराम घोडके | मे.के.बी.साळुंके अँड कं. |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# नाथ एलिव्हेटर्स



इमारतींच्या लिफ्टचे मॅन्युफॅक्चरर्स

**Nath ELEVATORS**

- Manufacturer of Elevators,
- Installation Commissioning &
- Maintenance of all type of Lifts.

Prop. : Y.D.Bhusare Patil
Cell : 9890909945, 9552528284

S.No.4/1+2, Narsiha Colony, Next to Balaji Law College, Thathwade, Pune - 411033.
Tel. : (O) 020-65104322 E-mail : nath.elevatorspune@gmail.com

# गुरूकृपा फॅब्रिकेटर्स

ग्रिल, सेफ्टीडोअर, शटर्स, गेट, चायनल (गेट)
शेड इ. सर्व प्रकारची वेल्डींगची कामे करून मिळतील.

प्रो. सुभाष रेपाळे

मोबाईल - ९८२२७०४६०२, ९७६६६५२६९६
डि.आर.गव्हाणे पेट्रोल पंपासमोर, शास्त्री चौक, आळंदी रोड, भोसरी, पुणे - ३९

मराठा समाजासाठी अग्रणी विवाह संस्था



# बढे मराठा वधू-वर सूचक केंद्र

संचालक : प्रा.रावसाहेब बढे (M.A., B.Ed.)
मोबाईल - ९७६२०४३६१६, ९६०४१३१०३२
विश्वनाथ हौ.सो.बिल्डींग नं.६०/८, दत्त मंदिराजवळ, से.२८, गंगानगर, आकुर्डी, पुणे ४४
शाखा - अंबर प्लाझा-बी, एस.टी.स्टॅंड व ए.डी.सी.सी.बॅंकेजवळ, अहमदनगर.
www.badhemaratha.com Email : badhe.raosaheb@gmail.com



।। विना सहकार नाही उद्धार ।।

# श्री साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित



नोंदणी क्र.: पीएनए/एचएलआय/आरएसआर /९४१/१९९३-९४ स्थापना : ३ मे १९९३

आशियाना टॉवर्स, सातपुडा हौसिंग सोसा. सांगवी, पुणे - २७. मो.: ९०११५५८११०

मूळच्या अ'नगर जिल्ह्यातील परंतु पुणे येथे स्थायीक झालेल्या मंडळींनी सामाजिक जाणीवेचे भान ठेवून स्थापित केलेली व अल्पावधीत सभासदांच्या विश्वासास पात्र ठरलेली पतपेढी. संस्थेची वैशिष्ट्ये-

✣ संस्थेच्या मालकीचे संगणकीकृत कार्यालय ✣ तत्पर सेवा ✣ ठेवीवर आकर्षक व्याजदर
✣ सभासदांच्या गुणवान पाल्यांचा यथोचित सत्कार ✣ विनयशील कर्मचारी वर्ग
✣ सभासदांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यावर जास्तीत जास्त भर.



श्री.सखाराम कोंडिबा गागरे
संस्थापक अध्यक्ष



श्री.अरुण मार्तंड नरसाळे
अध्यक्ष



श्री.कुंडलिक विश्वनाथ घोडके
उपाध्यक्ष



श्री.पोपटराव आनंदराव जाधव
संचालक



श्री.गोविंद दामोधर ढोरमले
उपाध्यक्ष



श्री.पांडुरंग विश्वनाथ चाफे
संचालक



श्री.नवीनचंद्र श्रीकिसन नाबरिया
संचालक



श्री.निशांत रंगनाथ गिरी
संचालक




सौ.अलका दिलीप हरेल
संचालिका



सौ.राधाबाई मुरलीधर चौधरी
संचालिका



श्री.सोमा भिमा दाते
संचालक




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु असून विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.


संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ठुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५



ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री. सुनील तोटे (suniltote11@gmail.com) (Cell : 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून 'पारनेर भवन', मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

श्रीमान ______________________

______________________

______________________

______________________


पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
कार्याध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन जोडबंगलेधारक सोसायटी,
चिंतामणी नगर भाग-२, बिबवेवाडी,
पुणे ४११ ०३७. **मो.: ९४२०६९६७९०**